



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह

युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..




संपर्क :- 9129582958

पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष ३ रे | अंक : ७१० . वा | शुक्रवार | दि. १५ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्ह्याच्या विकासाबाबत भाईजींचे योगदान नाकारलेच जाऊ शकत नाही...

## खामगाव-जालना रेल्वे मार्गाला गती देण्यासाठी बुलढाणा अर्बन उभारणार ३०० कोटींचे रोख...

### स्वा.प्रतापराव जाधव, अशी असावी लागते विकासाची दृष्टी...

भाग-5



**जनसंचलन/बुलढाणा**

गेल्या १५ वर्षांत जिल्ह्याचे नेतृत्व करणारे खासदार प्रतापराव जाधव विकासाच्या बाबतीत अनेक पोकळ दावे करीत असतात. मात्र, पोकळ दावे कितीही केले तरी त्याने वस्तुस्थिती कधीच बदलत नसते. त्याउलट कुठलेही राजकीय पद नसताना बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी जिल्ह्याच्या विकासात जे काही योगदान दिले आहे, ते कितीही प्रयत्न केले तरी नाकारले जाऊ शकत नाही. जिल्ह्याची भाग्यरेषा बदलवणाऱ्या खामगाव-जालना रेल्वेमार्गाच्या बाबतीत हे तर स्पष्टच आहे. १५ वर्षे लोकसभेत खुर्ची उबवणारे प्रतापराव जाधव यांना या प्रकल्पाबाबत अपयश आले. त्याउलट आता भाईजींनी या प्रकल्पाच्या विकासासाठी पुढाकार घेत बुलढाणा अर्बन या प्रकल्पासाठी ३०० कोटींचे रोखे उभारणार असल्याची घोषणा करून प्रतापरावांच्या पुढे एक पाऊल टाकले आहे. खरं तर कोणत्याही भागाला विकसित व्हायचे असेल तर त्या ठिकाणी महामार्ग, रेल्वे मार्ग यासारख्या सुविधा जरुरी आहेत. बुलढाणा जिल्ह्यात वर्षानुवर्षे या सुविधा नसल्याने जिल्हा मागास राहिला. व्यापारी उलाढाल करण्यासाठी रेल्वेमार्गासारखा दुसरा सर्वोत्तम पर्याय नाही. हेच हेरून सुमारे सात-आठ दशकांपूर्वी खामगाव-जालना या महत्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाची संकल्पना पुढे आली. वर्षामागून वर्षे गेली, दशकामागून दशके गेली, सरकारामागून सरकारे गेली, मात्र खामगाव-जालना रेल्वे मार्ग काही केल्या पुढे सरकत नव्हता.

प्रत्येक निवडणुकीत खामगाव-जालना रेल्वेमार्गाची फक्त चर्चा होत होती. प्रत्येक लोकप्रतिनिधी या प्रकल्पासाठी मी काय-काय केले, याची शेखी मिरवत असे. या प्रकाराला बुलढाण्याचे विद्यमान खासदार प्रतापराव जाधव हेही अपवाद नाहीत. निवडणुका जवळ आल्या की, दोन-चार पत्रे, निवेदने सरकारकडे सोपवायची, त्याची वृत्तपत्रातून बातमी प्रकाशित करायची, हाच कित्ता प्रत्येक लोकप्रतिनिधींने गिरवला. याला प्रतापरावदेखील अपवाद ठरतील तरी कसे? खामगाव-जालना रेल्वे मार्ग व्हावा यासाठी रेल्वे लोक आंदोलन समिती गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्न करीत आहे. १५ वर्षे बुलढाण्याचे खासदार राहूनसुद्धा खासदार प्रतापरावांनी हा मार्ग तातडीने पूर्ण व्हावा, यासाठी प्रतापरावांचा बुलंद आवाज निघालाच नाही. त्यांचा हा आवाज शासनापर्यंत पोहोचला नसावा कदाचित त्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास मोठा विलंब झाला. असे असले तरी अखेर दोन दिवसांपूर्वी राज्य शासनाने या प्रकल्पासाठी निधीची तरतूद घोषित केली. असे होताच प्रतापराव पुन्हा या प्रकल्पाचे श्रेय घेण्यास समोर आलेले आहेत. मात्र, याउलट राधेश्याम चांडक यांनी श्रेयवादाच्या गटारात उडी न घेता त्यांनी थेट हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास जावा व जिल्ह्याचे नशीब पालटावे, यासाठी तात्काळ ३०० कोटींचे रोखे बुलढाणा अर्बनच्या माध्यमातून उभे करण्याची घोषणा केली. त्यामुळे कमीत कमी आता निधीच्या कमतरतेतून हा प्रकल्प रखडणार नाही, हे तर स्पष्ट झाले आहे. भाईजींसारखी तत्परता प्रतापराव कधीही दाखवू शकले नाहीत, हे तर जगजाहीर आहे. विकासाची दृष्टी महत्वाची असते. मग तुमच्याकडे पद असो की नसो. प्रतापरावांकडे खासदारकी होती, तरीही विकासात बाबतीत जिल्हा मागास राहिला. याउलट राधेश्याम चांडक उर्फ भाईजी यांनी जिल्ह्याच्या विकासात भरीव असे योगदान दिलेले आहे. त्यांचे हे योगदान त्यांचे विरोधक देखील नाकारू शकत नाहीत. सहकाराच्या माध्यमातून भाईजींनी जिल्ह्याच्या विकासात जी भर घातली आहे, ती कोणालाही घालता आलेली नाही. त्यामुळे खरेतर भाईजींसारखा चेहरा हाच जिल्ह्याचा भावी खासदार असणे हे जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. **आज भारतीय जनता पक्षात भाईजींच्या उमेदवारीसाठी मोठी मागणी होत आहे. आता खरेतर निर्णय भाजपला करावयाचा आहे. जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांच्या भावनांचा मान राखायचा आहे का? हा पूर्णपणे भाजप पक्षश्रेष्ठींचा निर्णय आहे. परंतु जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर भाजप नेतृत्वानेही येथे बदल करणे आज क्रमप्राप्त झाले आहे.**

# व्यसनामुळे घराबाहेर जा म्हटल्याने वडिलाने केला मुलाचा खून...

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जळगाव जामोद व्यसनाधीन वडिलांना घर सोडून जा म्हणणाऱ्या तरुण मुलावर दारुड्या वडिलांनीच कुऱ्हाडीचे वार करत संपवल्याची घटना तालुक्यातील आसलगाव बाजार येथे १३ मार्च रोजी रात्री घडली. याप्रकरणी पोलिसांनी काही तासांतच गुन्ह्याचा छडा लावत आरोपी वडील प्रल्हाद पांडुरंग रायपुरे (६८) याला अटक केली. जळगाव जामोद पोलिस स्टेशन हद्दीमध्ये येत असलेल्या आसलगाव बाजार येथे जिगाव येथील कुटुंब वास्तव्यास आहे. त्यातील आरोपी सातत्याने दुकानात जाऊन दारू पित होता. त्यामुळे आपल्याला समाजात अपमानित व्हावे लागते. घरातील सर्वांनाच मानसिक आणि शारीरिक त्रास होत असल्याने मुलगा शिवाजी प्रल्हाद रायपुरे (३६) याने वडिलांना खडसावले. घर सोडून जाण्याचे सांगितले. त्यानुसार आरोपी प्रल्हाद रायपुरे हा कापडाची पिशवी घेऊन घराबाहेर गेला. त्यानंतर बुधवारी रात्री १ वाजेच्या दरम्यान गाढ झोपेत असलेला मुलगा शिवाजीच्या गळ्यावर कुऱ्हाडीने वार केले. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सकाळीच उघडकीस आली.माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. तरुणाचे प्रेत शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय जळगाव जामोद येथे पाठविण्यात आले. घटनेचा पंचनामा करीत असतानाच पोलिसांनी घटनेबद्दल सखोल विचारपूस केली. त्यामध्ये मृताचे वडील प्रल्हाद पांडुरंग रायपुरे याने खुनाची कबुली दिली. त्यामुळे खुनाचा तपास पोलिसांनी काही तासांच्या आतच छडा लावला. पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्याचा सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी विकास करणार संदीप शेळकेंचे प्रतिपादन...

## मेहकर तालुक्यात वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला भक्कम प्रतिसाद...

**जनसंचलन/मेहकर**

बुलडाणा जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक परंपरेचा गौरवशाली वारसा लाभलेला आहे. जगभरातल्या लोकांना बुलडाणा जिल्ह्याबद्दल कुतूहल आहे. मात्र बाहेरचे लोक जेव्हा जिल्ह्यात येतात, जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना भेटी देतात तेव्हा इथली अवस्था पाहून त्यांना आश्चर्य वाटतं..एवढं सगळ असूनही एवढ्या वर्षात पर्यटकांसाठी चांगली सोय आम्ही करू शकलो नाही, पर्यटकांना आकर्षित करू शकलो नाही हे आमच्या लोकप्रतिनिधींचे अपयश नाही का? असा सवाल करीत जन-तेने लोकसभेत पाठवल्यास जिल्ह्याचा सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी विकास करून असा शब्द संदीप शेळके यांनी परिवर्तन रथयात्रेदरम्यान मेहकर तालुक्यातील विविध सभांना संबोधित करतांना दिला. १२ मार्चला वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला मेहकर तालुक्यातील विविध गावांत दमदार प्रतिसाद मिळाला यावेळी ते बोलत होते. तुम्ही बदल घडवा मी जिल्हा घडवतो असे ते यावेळी म्हणाले. १२ मार्चला सायंकाळी डोणगाव आणि नागपूर येथे कॉर्नर सभा झाल्या. यावेळी पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले की, आजही बुलढाणा जिल्हा हा मागासलेपणाच्या यादीत गणला जातो.



जिल्हावासियांसाठी ही मोठी खेदाची बाब आहे.जगाच्या पातळीवर बुलडाणा जिल्हा हा ऐतिहासिक ,सांस्कृतिक, अध्यात्मिक , तसेच पर्यटन बाबत वैभव प्राप्त असलेला एकमेव जिल्हा आहे. तरीसुद्धा या जिल्ह्यात पाहिजे तसा विकास झाला नाही. त्यामुळे आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी ३० वर्षात काय दिवे लावले? असा प्रश्न उपस्थित होतो संदीप शेळके म्हणाले. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निघालेली वन बुलढाणा मिशन या राजकीय चळवळीची परिवर्तन रथयात्रा सध्या मेहकर तालुक्यात आहे. याअ-ाधी खामगाव, शेगाव, संग्रामपूर, मोताळा तालुक्यात विकासाचे व्हिजन मांडून शेळकेंनी परिवर्तनाचा एल्गार पुकारला. शेळके यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मांडलेल्या विचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळतोय. जिल्ह्याचा मागासलेपणाचा कलंक दूर करण्यासाठी वन बुलढाणा मिशन या राजकीय चळवळीची सुरुव-ात केली. या माध्यमातून बुलढाणा



जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ब्ल्यू - प्रिंट आम्ही तयार केली आहे. जनतेने खासदारकीची संधी दिली तर त्यावर पुरेपूर अंमलबजावणी आम्ही करणार असल्याचा शब्द संदीप शे-ळके यांनी दिला. ते म्हणाले जिल्ह्यात परिवर्तनाच्या माध्यमातून विकासाची गंगा आणायची आहे. नदीजोड प्रकल्प ,प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी, उच्च दर्जाचे शिक्षण ,महिला सक्षमीकरण ,सिंचनाची सोय असा विस्तारित विकास अजेंडा घेऊन परिवर्तनाच्या दिशेने रथयात्रा मार्गक्रमण करत आहे. जनतेने संधी दिल्यास संधीच सोनं करून दाखवल्याशिवाय राहणार नाही व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास नेमका कसा असतो हे आपण दाखवून देण-ार असल्याचे संदीप शेळके म्हणाले.

या गावात झाला जागर परिवर्तनाचा!

अंजनी, आंधृड, लोणी गवळी, वरूड, घाटबोरी ,इसवी, यागावात सकाळी यात्रा पोहचली. त्यांनतर पांगरखेड, विठ्ठलवाडी, बेळगांव, डोणगाव, नागापूर येथे परिवर्तनाचा जागर करण्यात आला.

# ईव्हीएम मशीन्स गुजरातमधूनच का आणल्या? नीला सत्यनारायण यांचा सवाल...

**वृत्तसंस्था/गुजरात**



गुजरातच्या सुरतमधील खासगी कंपनीकडून ईव्हीएम मशीन्स आणल्या गेल्या. तिथूनच बा ईव्हीएम मशीन्स आणण्यामागचे नेमके कारण काय, असा सवाल राज्याच्या माजी निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायणन यांनी केला आहे. एवढी वर्षे भेल किंवा केंद्रीय निवडणूक आयोगाकडूनच ईव्हीएम मशीन्स मागवल्या जात होत्या. मग यंदाच्याच निवडणुकांमध्ये सुरतच्या कंपनीकडूनच मशीन्स का मागवल्या गेल्या असे सत्यनारायणन यांनी एका टीव्ही वाहिनीवरील कार्यक्रमात विचारले.

# वाशिम-पुणे बसमधील प्रवाशांना लुटले..

**जनसंचलन/लोणार**

वाशिम-पुणे प्रवासी बसला शिव-ारातील पानस शिवारात दगड मारून अडवत अज्ञात चार दरोडेखोरांनी बसमधील प्रवाशांना लुटल्याची घटना १३ मार्च रोजी मध्यरात्री घडली. दरम्यान, एका प्रवाशाच्या पोटात चाकू खुपसून त्यास गंभीर जखमी करण्यात आले आहे. या प्रव-ाशावर सध्या जालना येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. वाशिमवरून एमएच-३७-टी-४००० क्रमांकाची ही बस पुण्याला प्रवासी घेऊन जात होती. लोणार ते पिंपळनेर मार्गावर पानस शिवारात अज्ञात दरोडेखोरांनी बसला जोरात दगड मारल्याचा आवाज झाल्याने बसचालक मंगेश घोडेकर (वय २६) आणि वाहक यांनी बस रस्त्याच्या कडेला थांबवून नेमका काय प्रकार झाला हे पाहण्यासाठी ते खाली उतर-ले. त्याचवेळी प्रवासी संजय धुळेकर व त्यांची पत्नी अर्चना धुळेकर हेसुद्धा



गाडीतून खाली लघुशंकेसाठी उतर-ले असता अज्ञात दरोडेखोरांनी त्यांना काठीने मारत चाकू मारून जखमी केले. त्यांच्याजवळील सोन्याची सुमारे २० हजार रुपये किमतीची अंगठी जबरदस्तीने काढून नेली. सोबतच या खासगी प्रव-ासी बसच्या काचा फोडल्याची तक्रार वाहक मंगेश घोडेकर यांनी लोणार पोलिसात केली. तक्रारीवरून लोणार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्र यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक युवराज रबडे हे करीत आहेत. या बसमधील आणखी काहींना लुटले किंवा नाही ही बाब स्पष्ट होऊ शकली नाही.


# चिखली पं. स. मधील एकास लाच घेताना रंगेहात पकडले!

**जनसंचलन/ चिखली**

चिखली पंचायत समितीत रावडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाज कल्याण विभागाचा लिपिकास लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने १४ मार्च रोजी ९ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले. रवींद्र हिंमतराव भंडारे ऊर्फ रावडी असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पंचायत समितीच्या समाज कल्याण विभागात तो कार्यरत आहे. या विभागांतर्गत गुंजाळा येथील एकाकडून गोठ्याचे बिल देण्यासाठी ९ हजारांची लाच घेताना लाचलुचपत पथकाने दुप-ारी साडेतीन वाजेच्या सुमारास सा-पळा रचून आरोपीस रांगेहात पकडले. दरम्यान, आरोपी भंडारे यास लाचलुच-पत विभागाने चौकशीसाठी ताब्यात घेत स्थानिक विश्रामगृहावर नेले. रात्री उशिरापर्यंत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. चिखली पंचायत समिती गेल्या काही दिवसांपासून कायम चर्चेत होते. पंचायत समिती अंतर्गत विविध लाभाच्या योजनांसंदर्भाने मोठ्या प्रमाणावर दलालांचा सुळसुळाट पाहता आर्थिक देवाण-घेवाणीशिवाय लाभार्थ्यांना कुठलाच लाभ मिळत नसल्याची ओरड होती. अशातच लाचलुचपत विभागाने केलेल्या



कारवाईने पंचायत समिती वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, संबंधित लिपिकाने मनरेगा अंतर्गत विहीर मंजूर करण्यासाठीदेखील लाभार्थ्यांकडून मोठी माया जमा केली असल्याची चर्चा आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# जागतिक महिला दिनानिमित्त चर्चासत्र आणि सत्कार संपन्न...

## खचलेल्या मनाला लढण्याचं बळ देणारी जिजाऊच... शाहीनाताई पठाण



जनसंचलन/बुलडाणा

कर्तुत्वान महिलाच जिजाऊं सावित्रीच्या विचारांच्या ख-या वारसदार आहेत. खचलेल्या मनाला लढण्याच बळ देणारी प्रत्येक महिला सावित्री जिजाऊ आहेच. त्यामुळेच देश आणि समाज प्रगतीपथावर आहे. असे मत सुप्रसिद्ध विचारवंत,स्त्रीमुक्ती चळवळीच्या नेत्या शाहीनाताई पठाण यांनी व्यक्त केले. स्थानिक आझाद हिंद महिला संघटना, जिजाऊ ब्रिगेड, किसान ब्रिगेड, राणी लक्ष्मीबाई ब्रिगेड, रमाई ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत महिलांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर चर्चासत्र तथा जिल्ह्यातील कर्तुत्वान महिलांच्या सत्काराचे आयोजन १३ मार्चला बुलढाण्यात करण्यात आले होते.यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना पठाण यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. यावेळी विचार पिठावर प्रबोधनकार अँड.सतीशचंद्र रोठे, प्रदेश महीला संपर्कप्रमुख सुरेखाताई निकाळजे, असलम शाह, श्रीकृष्ण सोनुणे, बाळकृष्ण पवार यांची उपस्थिती होती. जिजाऊ,सावित्री आणि नेताजींना सामूहिक माल्यार्पण व अभिवादन करून चर्चासत्राला सुरुवात करण्यात आली. वर्तमान परिस्थिती स्त्री समोरील आव्हाने आणि सामाजिक बंधने याची दैनंदिन कारणे बदलत आहे. कायदे बदलत आहे. तरीही महिलांच्या वाटेला अठरा विश्व दारिद्र येण्याचं एकमेव कारण म्हणजे महिला अभिव्यक्ती स्वातंत्र्य होय. काही प्रमाणात महिला जागतिक स्तरावर पोहोचल्या.परंतु ७० टक्के महिलांना अद्यापही अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळालेले नसल्याचा सुर चर्चासत्रातून समोर आला. उपस्थित मान्यवरांसह सत्कारमूर्तींनीही चर्चासत्रात आपल्या अनुभवातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर संवाद साधला. बुलढाणा जिल्ह्यातील कर्तुत्वान महीला सत्कारमूर्तींमध्ये अनिताताई दामोदर ठाकरे, दिपाली लक्ष्मण यंडोले, मंगलाताई पवार, अलकाताई खांडवे, पंचफुलाबाई गवई, मीराबाई ठाकरे, द्वारका राजेश जाधव, सुनिता राजू निकम, सुनीताताई जाधव, जोत्सनाताई नागरे, अनिताताई कापरे, मनीषाताई झांबरे यांना शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संघटनेच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

# राष्ट्रवादी सामाजिक न्यायविभाग च्या तालुका अध्यक्ष पदी प्रशांत डोंगरदिवे



जनसंचलन /चिखली


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बुलडाणा जिल्ह्याचे सर्वेसर्वा माजी मंत्री आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी दिलेल्या आदेशानुसार जिल्हा अध्यक्ष ऍड नाजेर काजी व जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू भारत बोन्द्रे यांनी दिलेल्या सूचनेनुसार सामाजिक न्याय विभाग चे जिल्हा अध्यक्ष दिलीप झोटे यांनी चिखली येथील सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस चे एकनिष्ठ युवा तडफदार कार्यकर्ते भाई प्रशांत डोंगरदिवे यांची राष्ट्रवादी काँग्रेस च्या सामाजिक न्याय विभाग चिखली तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष शंतनू भारत बोन्द्रे, जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ, विधानसभा अध्यक्ष प्रमोद पाटील, तालुका अध्यक्ष बाळासाहेब पवार, शहर अध्यक्ष तुषार बोन्द्रे, प्रदेश सरचिटणीस युवा शेखर बोन्द्रे, ओबीसी चे जिल्हा अध्यक्ष सुभाष देव्हाडे, ओबीसी तालुका अध्यक्ष प्रवीण घड्याळे, प्रसाद पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वे सर्वा व महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विचार समाजातील तळागाळात पोहचविण्याचे व राज्याचे माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे हात व विचार बळकट करण्यासाठी यशस्वी प्रयत्न करील असा आत्मविश्वास नवनियुक्त तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग प्रशांत डोंगरदिवे यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्ती बद्दल व भावी वाटचालीस उपस्थित सर्व मान्यवरानी शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यात ज्येष्ठ मतदारांमध्ये महिला अधिक ८५ वर्षावरील मतदारांसाठी घरपोच मतदानाची सुविधा

जनसंचलन / बुलडाणा

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. २३ जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यातील आकडेवारीनुसार जिल्ह्याच्या मतदार यादीमध्ये ज्येष्ठ नागरिक असलेल्या ८० ते ११० वयोगटातील एकूण ५९ हजार ६२५ मतदारांपैकी २३ हजार ६१३ पुरूष तर ३६ हजार १२ महिला मतदारांचा समावेश आहे. यात महिलांची टक्केवारी ६१ टक्के एवढी आहे. जिह्यातील एकूण मतदारांमध्ये पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. परंतु यावेळी ८० ते ११० वयोगटामध्ये महिलांची संख्या पुरूषांच्या तुलनेत अधिक आहे. या वयोगटातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. भारताच्या निवडणूक आयोगाच्या शिफारसीनुसार, कायदा आणि न्याय मंत्रालयाने सुधारणा केली आहे. त्यामध्ये घरपोच मतदानाची सुविधा देण्यात येणार आहे. यात ज्येष्ठ नागरिकांचे वय ८० वरील ८५ वर्षे करण्यात आली आहे. त्यानुसार ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या पात्र मतदारांना त्यांच्या मागणीनुसार घरपोच मतदानाचा पर्याय वापरण्यासाठी फॉर्म १२ डी प्रदान केला जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रीया जिल्हा निवडणूक अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्यास्तरावरून करण्यात येणार आहे.

# बुलढाण्यात बनणार ऑलिम्पिक दर्जाचा स्विमिंग पूल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची आचारसंहितापूर्वी आ. संजय गायकवाडांना मोठी भेट



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे धडाडीचे आ. संजय गायकवाड यांच्यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा लोकसभा आचार संहिता लागण्याअगोदरच बुलढाणा मतदार संघात मोठी भेट प्रदान केली आहे. यामध्ये ऑलिम्पिक दर्जाचा स्विमिंग पूलाचा समावेश करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यात राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावे, यासाठी आ. संजय गायकवाड हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. नुकतेच त्यांनी आतापर्यंतची सर्वात मोठी राज्य क्रीडा प्रतियोगिता बुलढाण्यात घेतली. यामध्ये राज्यातील अनेक खेळाडू सहभागी झाले होते. जिल्ह्यातील आणि राज्यभरातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, या दृष्टिकोनातून ते आयोजन होते. एवढेच नव्हे तर बुलढाण्यात ऑलिम्पीक दर्जाच्या स्विमींग पूलचा विषय त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्तावाद्वारे मागणी केली होती. त्या अनुषंगाने आज बुधवार १३ मार्च रोजी मुंबई येथे झालेल्या कॅबिनेटमध्ये अनेक विषय मंजूर करण्यात आले. यामध्ये बुलढाणा येथील श्री शिवाजी विद्यालय परिसरात असलेल्या खुल्या मैदानात आंतरराष्ट्रीय दर्जाचा स्विमिंग पूल बनवण्यासाठी सुमारे साडे ५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे लौकिक वाढवणारे धर्मवीर आखाडा परिसरात २५ कोटीचे फिजिओथेरपी सेंटर तसेच बुलढाणा विधानसभा मतदार संघातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी जयस्तंभ परिसरातील हिरोळे पेट्रोल पंप तसेच बस स्थानक परिसरातील प्रशासकीय इमारत या ठिकाणी १०६ गाळे हे बीओटी तत्त्वावर मान्य करण्यात आले आहे

# मंगळवारी महिला लोकशाही दिन...

जनसंचलन / खामगाव

दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. मार्च महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १८ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार मार्च २०२४ मधील तिसरा सोमवार हा दि. १८ मार्च असल्याने या दिवशं महिला लोकशाही दिन घेण्यात येणार आहे, असे महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी कळविले आहे.

# मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी घेतले श्रींच्या समाधीचे दर्शन

जनसंचलन / खामगाव

उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज गुरुवारी, दि. १४ मार्च रोजी शेगाव येथे श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. श्रींचे दर्शन घेतल्यानंतर संस्थानच्या वतीने श्री. पाटील यांचे स्वागत शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार आकाश फुंडकर, संतोष तराळे, संस्थानचे विश्वस्त हरीहर दादासाहेब पाटील, तसेच सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दर्शनानंतर श्री. पाटील अकोलाकडे रवाना झाले.

# जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेस आमदार शिंगणे यांच्या प्रयत्नातून ३०० कोटीच्या कर्जासाठी शासनाची हमी मंजूर...!

**जनसंचलन /बुलडाणा**

मंत्री मंडळाच्या दि. ११-०३-२०२४ च्या बैठकीत निर्णय होऊन शासनाने बुलडाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक मर्यादित बुलडाणा बँकेस रु. ३०० कोटीच्या मध्यम मुदती कर्जास शासन हमी देण्याबाबतचा वित्त विभागाने दि. १४-०३-२०२४ रोजी शासन निर्णय जारी केला आहे. दि. बुलडाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेला शासनाच्या मदतीनंतर सन २०१६ मध्ये बँकिंग परवाना प्राप्त झाला व त्यानंतर बँकेचे कामकाज सुरळीत सुरु झाले. बँकेचा व्यवसाय वाढविण्यासाठी व नफा क्षमता वाढविण्यासाठी दि. बुलडाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेने राज्य शासन किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्याकडून रु ३०० कोटीचे सॉफ्ट लोन मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दि. बुलडाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेला हे कर्ज द्यावे व या कर्जासाठी शासनाने हमी घ्यावी असे प्रस्तावित करण्यात आले. दि. बुलडाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेने केलेली प्रगती लक्षात घेऊन शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन या कर्जाला शासन हमी देण्याचा निर्णय आज दि. १४-०३-२०२४ रोजी जारी केला. या निर्णयानुसार रु ३०० कोटींच्या मध्यम मुदती कर्जाच्या परतफेडीसाठी २ वर्षाचा अधिस्तगन कालावधी ( ) व ५ वर्षाचा परतफेडीचा कालावधी असा एकूण ७ वर्षाचा कालावधी मंजूर केला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे दि. बुलडाणा



जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेची आर्थिक परिस्थिती आणखीन मजबूत होणार आहे. सदर प्रस्ताव हा शासनाकडे अनेक दिवस प्रलंबित होता व निर्णयाला विलंब लागत होता यासाठी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी ठाम भूमिका घेऊन व वेळोवेळी विविध स्तरावर पाठपुरावा करून आणि प्रसंगी आपले राजकीय करियर (कारकीर्द) पणाला लावून हा प्रस्ताव मंजूर करून घेतलेला आहे.

# सायन्स ऑलिम्पियाडमध्ये द व्हिजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींना सुवर्णपदक

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील चैतन्यवाडी परिसरातील द व्हिजन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल सायन्स ऑलिंपियाड या परीक्षेत यश मिळवत पहिल्या लेवलमध्ये सुवर्णपदक मिळविले आहे. या परीक्षेत शानु जाधव, रुचिका शिरसाट, अभिलाषा जाधव, श्रद्धा आडे, भरती प्रजापत यांनी प्राविण्य प्राप्त केले असून त्यांना गोल्ड मेडल्स आणि सर्टिफिकेट देऊन सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत गौरवण्यात आले. बक्षीस यावेळी मुख्याध्यापिका




मंजुषा पांडे, छगन टेकाळे, लता निकम, नंदिनी कलवाघे, माधुरी कलवाघे, प्रियंका सोनटक्के, अर्चना देवकर, पूजा सोळंके, शंकर सोळंके, विकास काटकर, हरीश जामदार, मनीषा दांडगे, आंबेकर, पांडे व खरात आदी उपस्थित होते.

